**मॉरिशसच्या राष्ट्रीय दिन सोहळ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित (12 मार्च 2025)**

12 मार्च 2025

पंतप्रधान नरेंद्र मोदी मॉरिशसच्या 57 व्या राष्ट्रीय दिन सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

2. या सोहळ्यात, मॉरिशसचे राष्ट्रपती धरमबीर गोखूल यांनी पंतप्रधान मोदी यांना 'ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ द स्टार अँड की ऑफ द इंडियन ओशन' (G.C.S.K) हा मॉरिशसचा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान केला. हा पुरस्कार मिळवणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे पहिले भारतीय नेते ठरले आहेत.

3. पंतप्रधान मोदी यांनी हा पुरस्कार भारत आणि मॉरिशस यांच्यातील विशेष मैत्रीला तसेच 1.4 अब्ज भारतीय नागरिक आणि मॉरिशसच्या 1.3 दशलक्ष बंधू-भगिनींना समर्पित केला.

4. राष्ट्रीय दिन सोहळ्यात भारतीय नौदलाच्या संचलन पथकाने परेडमध्ये भाग घेतला. याशिवाय, भारतीय नौदलाचे एक जहाजही या निमित्ताने मॉरिशसच्या बंदरावर दाखल झाले.

पोर्ट लुईस

12 मार्च 2025